जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -४२६ दिनांक - १०/१०/२०२४

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन

### खोटे सर्टिफिकेट दाखवून दवाखाना चालवत असणा-या बोगस डॉक्टरला ठोकल्या बेडया

वारजे माळवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. ३९२/२०२४, महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर अ‍ॅक्ट १९६१ मधील कलम ३३, ३५, ३६, तसेच भारतीय न्याय संहिता ३१८(४), ३१९(२), ३३६(२), ३३६(३), ३३८ हा दाखल गुन्हा वारजे माळवाडी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात मुळव्याध उपचार केंद्र, श्रीकृष्ण पॅलेस, सय्यदनगर, वारजे माळवाडी, पुणे येथे घडला आहे. गुन्ह्यांतील आरोपी इसम नामे **बिभूती बिमल बागची वय ४३ वर्षे रा.गोकुळनगर पठार वारजे माळवाडी पुणे** याने वरिलप्रमाणे असणा-या पत्यावर दवाखाना उभारुन तसेच ( N.D.) (B.E.M.S) (N.D.) ही पदवी घेतली असल्याचे भासवून महाराष्ट्र काऊन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन यांच्याकडून मान्यता प्राप्त शैक्षणिक अर्हता प्राप्त न करता, बनावट सर्टिफिकेट सादर करुन नोंदणी करुन व्यवसाय करित असल्याचे मिळून आला असल्याबाबतचा तक्रारी अर्ज पोलीस ठाणे येथे प्राप्त झाला. प्राप्त तक्रारी अर्जाप्रमाणे वारजे माळवाडी पोलीस ठाणेकडील अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देवुन वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास केला असता सदरचा आरोपी नामे बिभुती बिमल बागची हा सदर ठिकाणी बनावट सर्टिफिकेट्सचा वापर करुन पेशंटवर उपचार करित असून त्यांना कोणत्याही अर्हता प्राप्त शिक्षण न घेता गोळ्या औषधे देखील देत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर घटनेच्या घटनास्थळी वरिष्ठांनी व वारजे माळवाडी पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार भिंगारदिवे, गाडे, पाटील व महिला पोलीस अंमलदार किंद्रे यांनी याबाबत तपास चालु केला. निष्पन्न आरोपीस शितापीने ताब्यात घेवून गुन्ह्यात अटक करण्यात आली असून गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगीरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३,श्री.संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग, पुणे शहर, श्री.सरदार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निलेश बडाख, पोलीस अंमलदार भिंगारदिवे, गाडे, पाटील व महिला पोलीस अंमलदार किंद्रे यांनी केली आहे.